छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९४२ । वर्ष २० अंक १२।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष २९ अंक २)
वार्षिक वर्गणी ₹ २००। मूल्य ₹ २०। पृष्ठे २०

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

या पद्याची चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

आज प्रचीती द्या!



गिरिकुहरातिल गर्द बनातिल सिंहाच्या छाव्यांनो,
तिमिरपुरातिल कृष्णघनातिल तेजस्वी ताऱ्यांनो,
प्रलयंकर शक्तीची तुमच्या आज प्रचीती द्या
तुमच्या शुभकर सामर्थ्याची आज प्रचीती द्या ।। ध्रु.।।

मूक मनांच्या कारागारी धुमसत जी चिनगारी
वीज होउनी कोसळु द्या ती उद्धत अंधारी
त्या भस्मातुन बहरुन येइल हिरवा स्वर्ग उद्या ।। १।।

शतकांपूर्वीची जयगीते अजुनि घुमत कानी
शतकांपूर्वी अखिल धरेला क्षेम दिले आम्ही
ते सळसळते पौरुष फिरुनी नसांत वाहू द्या ।। २।।

पवित्र मूर्ती प्रिय आईची दुभंग परि झाली
अमित संपदा अतुल वैभवे कुटिलांनी लुटली
गतकालाचे विषाद गौरव भविष्य घडवू द्या ।। ३।।

सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमात्र येथे
सर्वार्थांनी रत्नवंत हो क्षेत्रक्षेत्र येथे
या भूमीला सृजनांची नभपंखी स्वप्ने द्या ।। ४।।

समर्पणाची हाक जयांच्या हृदयाला कळली
अजिंक्य झाले राष्ट्र तयांचे अभेद्य बलशाली
सार्थकतेच्या परिसाने त्या जीवन उजळू द्या ।। ५।।

– वाचस्पती स्वर्णलता भिशीकर

पद्याचा अर्थ : सदर पद्यातून 'आपल्या मातृभूमीचे गतवैभव मिळवून देण्यासाठी स्वत:मधील सकारात्मक शक्तीचे सामर्थ्य जगाला दाखवून द्या', असे कुमार युवक-युवतींना आवाहन केले आहे. अशा कुमार युवक-युवतींना कवयित्री निडर अशा सिंहाच्या छाव्याची उपमा देतात. हे युवक-युवती अंधारात प्रकाश दाखवणारे जणू तेजस्वी तारे आहेत. कवयित्री त्यांना उद्देशून म्हणतात, 'ठिणगीच्या स्वरूपात असलेली, तुमच्या मनात दबलेली सुप्त अस्मिता जागी करण्याची वेळ आज आली आहे. जिथे-जिथे अनिष्ट रूढी, परंपरा, दहशतवादाचा अंधकार माजला आहे तिथे -तिथे कधी आत्मशक्तीच्या तर कधी आत्मसमर्पणाच्या जोरावर प्रहार करण्याची वेळ आज आली आहे. शतकांपूर्वी ही मातृभूमी सुजलाम-सुफलाम होती. तिच्या यशाची, गौरवाची गीते आजही आसमंतात भरून आहेत. काळाच्या ओघात अनेकांच्या आक्रमणांमुळे तिचे वैभव लयास गेले आहे. तिचे गतवैभव तिला प्राप्त करून देणे, हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी तुमच्यातील सामर्थ्याला विधायक कृतीची जोड द्या. आकाशाला गवसणी घालणारी भव्य स्वप्ने तुम्ही पाहा. प्रत्येक क्षेत्रात नवे नवे प्रयोग, संशोधन करून स्वत:बरोबर देशाला समृद्ध करा. त्यागाच्या सामर्थ्यावर राष्ट्र उभे राहते. ज्या-ज्या वेळी राष्ट्रासाठी त्याग केला गेला ते-ते राष्ट्र बलशाली झाले. त्यांच्यावर कुणी आक्रमण करू शकले नाही, असा इतिहास सांगतो. राष्ट्राला बलशाली करण्यासाठी पुनश्च एकदा भौतिक सुखाचा त्याग करण्याची वेळ आली आहे. 'कशासाठी जगावे' आणि 'कसे जगावे' हे कळले की तुमच्या जीवनाचे सार्थक होईल,' असा विश्वास कवयित्री व्यक्त करते.

छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद शके १९४२। वर्ष २० अंक १२

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२

एकूणात ३३८ वा अंक, वर्ष २९ अंक २)

प्रकाशन दिनांक – सौर २७ भाद्रपद, शके १९४२/१८ सप्टेंबर २०२०

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया

मानद संपादक : शैलजा देशमुख

संपादक मंडळ
वाच. कांचनगंगा गंधे
नीलिमा करमरकर, आश्लेषा महाजन

कार्यकारी संपादक
शिल्पा कुलकर्णी

साहाय्यक कार्यकारी संपादक
अनादि ढवळे

मुखपृष्ठ – मिलिंद मुळीक

आतील चित्रे – चित्रांजली

संपर्क पत्ता
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५

छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी

वार्षिक : ₹ २०० द्वैवार्षिक : ₹ ४००
त्रैवार्षिक : ₹ ५५० दशवार्षिक : ₹ १७००

या अंकाची किंमत : ₹ २०/–

घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा
चेक/डी.डी. **'ज्ञान प्रबोधिनी'** अथवा
'Jnana Prabodhini' याच नावाने काढावा.

NEFT साठी बँकेचे तपशील पुढीलप्रमाणे –
Account Name - Jnana Prabodhini
Bank Name - Bank Of India
Account No.- 051510110004917
Branch - Shanipar, Pune
IFSC Code - BKID0000515
ऑनलाईन वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

अंतरंग

४. कविता... **अश्व आकांक्षेचे** - मुबारक शेख

५. कथा... **भैरू** - अमोल बापट

१०. ललित... **दृष्टी** - डॉ. संगीता गोडबोले

१२. विज्ञान कृतिपर... **मुंग्यांचा मार्ग शोधा** - रिषभ बागवडे

१३. प्रासंगिक... **आठवणीत राहिलेली स्पर्धा** - सायली कुलकर्णी

१६. वाचलेच पाहिजे असे काही... **तीन हजार टाके** - नीलिमा करमरकर

मुखपृष्ठाच्या आतील पद्य... **आज प्रचीती द्या...** * - वाच. स्वर्णलता भिशीकर

याशिवाय : ओळखा पाहू (४), गरजणारा कप (९), उमलणारे फूल (११), हा हा हा...(१७) स्वयंशोध चाचणी, प्रतिसादी वाचकवीर व्हा...(१८)

संवाद

प्रिय प्रबोधकांनो,

कसे आहात सगळे? *ऑनलाइन* गोष्टींना तुम्ही सर्वजण सरावलायत आणि आता त्या माध्यमात स्थिरावलायत देखील!! शाळेचा अभ्यास, गटात करायच्या कृती, त्या निमित्ताने होणाऱ्या गटचर्चा, पूरक वाचन हे सर्व काही *ऑनलाईन* करणं तुम्हाला सवयीचं झालंय. तरीही तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं असं 'एकेकटं' शिकण्याचा कंटाळा देखील येत असेल, हो नं... (वर्गात एकत्र असण्याची गम्मत काही वेगळीच असते! लवकरात लवकर असे एकत्र यायला मिळो, ही सदिच्छा.)

ऑनलाइन शिकताना तुमचा उत्साह आणि ऊर्जा दिवसभर टिकून राहावी, यासाठी तुम्ही काय-काय करता? नेमाने व्यायाम, तासांमधल्या मोकळ्या वेळेत घरातल्या घरात चकरा मारणं, झाडाझुडपांबर नजर टाकणं, संगीत ऐकणं, कल्पक कृती करणं इत्यादींमुळे मेंदू आणि मन ताजंतवानं व्हायला मदत होईल.

दरवर्षी तुम्ही ज्याची आतुरतेनं वाट पाहात असता, त्या 'छात्र प्रबोधन' दिवाळी अंकांचं काम विभागात जोरात सुरू झालं आहे. **दिवाळी अंकांच्या अंतरंगाची झलक आणि अंकांची नोंदणी कशी करायची, त्याचे तपशील अंकातील पान क्र. १९ वर दिले आहेत.** तेव्हा तुमचा अंक सवलतीचा लाभ घेत राखून ठेवा. तुमचे नातेवाईक, भावंडे, मित्र-मैत्रिणी यांच्यापर्यंत आवर्जून दिवाळी अंकांची माहिती पोहोचवा!

तुमचा रोजचा *स्क्रीनटाईम* बघता डोळ्यांची योग्य ती काळजी घ्या! तुमची,

शिल्पाताई

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!

वार्षिक प्रायोजक – • श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे • सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे • श्री. उदय परांजपे, पुणे • डॉ. महेश बेडेकर, ठाणे • एक हितचिंतक, पुणे

वाचूया – मनातला
निर्धार जागवणारी
कविता – 'उमेद'
– संजिवनी बोकील

कविता

अश्व आकांक्षेचे

स्वत:ला ओळखणे ही खरी परीक्षा
पराजयाला द्यावी विजयाची दीक्षा।।

झुगारून टाकायचे सदा दडपण
ईप्सित गाठण्या करायचा पण।।

भूतकाळाच्या गुंत्यातून बाहेर पडा
घेऊनी भाग्य बघा वर्तमान खडा।।

नाही कष्टाविना मिळत जगी काही
नेटाने चालता बाहूत दिशा दाही।।

ध्यानात घ्या असते संकटात संधी
ठरते तीच उत्तुंग यशाची नांदी।।

होते शून्यातुनी निर्माण विश्व
धावू द्या बेफाम आकांक्षेचे अश्व।।

– मुबारक शेख
१६२/८ ब, रेल्वेलाईन्स, सोलापूर ४१३००१

ओळखा पाहू

खाली दिलेल्या उभ्या, आडव्या, तिरप्या आणि खालून वर, वरून खाली अशा अक्षरांच्या मांडणीतून ५ वाक्प्रचार शोधून काढा पाहू; आणि हो, त्यांचे वाक्यात उपयोग करून पाच वाक्यांचा सुसंगत परिच्छेद देखील लिहा.

वि	वा	मा	अ	र्षि	र	ल	क	भ्यं
क	र	दि	भै	वी	टो	बो	र	ळी
चं	छो	ज	द	ल	व	ब	ना	णे
बा	णे	व	ण	डा	च	डी	ल	र
लं	बा	ग	र	घा	वी	व	व्य	क
डा	का	न	ला	ळि	ल	ळ	दी	दो
छा	रा	डी	ज्ञ	वा	न	णे	खा	उ
पा	ना	द्य	रौ	सं	गा	त्य	व	दो
मू	ग	गि	ळ	णे	च	सु	कृ	उ

जरूर पाहा : आगाशिव लेणी – कराड, जि. सातारा – बौद्ध भिक्खुंच्या वर्षावासासाठी खोदलेली लेणी.

वार्षिक प्रायोजक – • श्रीमती लीला आचवल, नाशिक • सौ. उषा पुरंदरे, पुणे
• सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे • श्री. रवी बांडे, शिवापूर, पुणे • एक हितचिंतक, पुणे

भैरू

– अमोल बापट

'ए कोने तिते? हात कोन घालतंय कुंपणीतनं?'

कितीही लपून छपून आलं, तरी बोंबलत कुणीतरी येतंच तडमडायला. जरी कुंपणाच्या आत असली, तरी खाली पडलेली बोरं टिपली तर कुणाचं काय बिघडणार आहे? उगाचच का बरं हाकलायचं बारकी पोरं दिसली की... 'कोण हटकायला आलंय मला,' असं म्हणत झाडीतून बाहेर डोकं काढत पाहिलं, तर साधारण माझ्याच एवढा एक मुलगा हातात काहीतरी घेऊन माझ्या दिशेनं येत होता. अवतार एकदम गबाळा; पण डोळ्यांत असे भाव जणू काही याच्या मालकीच्या भागातच मी चोरून शिरलोय. मी एकदम चक्रावलो आणि थोडा रागही आला त्याचा.

तो जो कुणी होता तो इथे राहणाऱ्या कुटुंबांपैकी कोणीही नव्हता; मग हा कोणत्या अधिकारानं मला बोलतोय, हे कळेना. तोवर तो माझ्याजवळ येऊन पोहोचला होता. तो जसा जवळ आला, तशी माझी नजर त्याच्या हातातल्या वस्तूवर खिळली.

''तू कोन? आनि काय करतुस इते?'' त्यानं दरडावल्यासारखं विचारलं.

''आधी तू सांग तू कोण आहेस? मी इथे राहणाऱ्या लोकांना ओळखतो,'' मी दटून म्हणालो.

''तसं नाई, मी वळखलं नाही ना! तू कुठे राहतोस?''

''मी इथे पलीकडेच एका *बिल्डिंगमध्ये* राहतो आणि तू?''

''मी या कुंपनापलीकडे जी वस्ती हाये ना तिथंच राहतो.''

''पण ते काय आहे तुझ्या हातात?'' मी विचारलं.

''ही बेचकी हाय. तुला पाह्यची का?''

''हो मला आवडेल वापरून बघायला.''

मग त्यानं बोराच्या झाडाखालचाच एक गोलसर दगड निवडला आणि हातातल्या बेचकीत रबराच्या साहाय्यानं घट्ट विणलेल्या कापडवजा भागात ठेवला. डाव्या हातात Y आकाराच्या झाडाच्या खोडाचा दांडा घेतला आणि उजव्या हातानं तो दगड ठेवलेलं कापड खच्चून ताणलं. एक डोळा मिटून त्यानं कशाचा तरी नेम धरला आणि डाव्या हाताची मूठ सोडली... त्या बरोब्बर झुप्पऽऽ

कोणी नसे जन्माने, लहान अथवा मोठा। कर्तृत्वाने जो तो होई, निज भाग्याचा जगी निर्माता।।

वार्षिक प्रायोजक – • सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद • कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे
• डॉ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर • सौ. सीमा परांजपे, पुणे • एक हितचिंतक, दिल्ली

असा आवाज आला आणि तो दगड कुठल्याशा झाडावर दाणकन आपटला... ''श्या! नेम चुकला, नाह्यतर तो पेरू कचकन भुईवर पडला असता.''

मला एकंदरीतच ते बेचकी नावाचं प्रकरण भलतंच आवडून गेलं. माझ्या चेहऱ्यावर ते दिसतच होतं. ते माझे भाव अचूक पकडत त्यानं मला विचारलं, ''तुला हवीये का आशी बेचकी?''

मी कुठलाही विचार न करता तात्काळ 'हो' असं म्हणून दुजोरा दिला.

''मंग येक काम कर, उद्याच्याला येताना पाच रुपये घेऊन ये. यातली ही रबरी नळी मला बाजारातनं आनावी लागेल. बाकी हा आकडा काय कुठच्याही झाडाला मिळेल आनि दगड ठेवायचं कापड मी वस्तीवर गेलो की विनतो.''

''हे कापड तू विणणार आणि मग इथे बसवणार?''

''होय त्या बिगर कसं बसनार इथे?''

''बरं, ठीक आहे. मी उद्या पाच रुपये देतो तुला.''

''चालेल मग उद्याच्याला मी नळी आनि बाकी वस्तू घेऊन इथंच थांबतो.''

''तुझं नाव काय रे?'' मी म्हणालो.

''मला सगळे भैरू म्हनतात.''

लगेच दुसऱ्या दिवशी आईकडून पाच रुपये घेतले आणि भैरूला नेऊन दिले. त्यावर तो म्हणाला की, तू परत तासाभरात इतेच ये. मग आपण इतेच बसून तुझी बेचकी बनवू. माझं लक्ष सतत त्याच्या येण्याकडेच होतं आणि इतक्यात तो सगळं साहित्य घेऊन आलाच!

मग त्यानं माझ्या हाताचा अंदाज घेऊन कोयतीच्या साहाय्यानं ती वाळकी फांदी अचूक Y आकारात तोडली. मग त्याच कोयतीनं तासून त्याची साल काढून टाकली. ती वाळलेली फांदी आता एकदम गुळगुळीत झाली होती. मग त्यावर त्यानं बाजारातून आणलेली रबरी नळी Y च्या वरच्या दोन्ही टोकांना घट्ट बसवली. मग त्यानं कुठलासा जाड दोरा घेतला आणि दोन तारांमध्ये सराईतपणानं गुंडाळला. मग त्यावर कुठलासा डिंक लावून तो वळवला. अशा पद्धतीनं त्यानं बऱ्याच सुरनळ्या बनवल्या. मग त्या शेजारी-शेजारी रचून त्यानं चटचट त्या एकमेकांत गुंफायला सुरुवात केली आणि बघता बघता त्याची एक सुंदरशी मेश तयार झाली. त्यानं विणलेला दोरा न दोरा लयबद्ध दिसत होता. मग त्यानं ती मोठ्या कसबानं रबरी नळीच्या दुसऱ्या टोकाला बांधली. हा हा म्हणता बेचकी तयार झाली होती. रबरी नळीचा जोर व्यवस्थित पडतो की नाही हे पाहण्यासाठी त्यानं तो दोन-तीनदा ताणली. एकूण त्याच्या आविर्भावावरून बेचकी उत्तम झाल्याची त्याची खात्री पटली.

''झाली?'' मी न राहवून विचारलं. त्यावर भैरू म्हणाला, ''नाय, आता शेवटचं काम. या फांदीचं कूस हातात जायला नको म्हणून मग हे काळं रबर गुंडालायचं... की मग झालं.''

मग त्यानं ते तलम रबर Y वर गुंडाळायला सुरूवात केली आणि शेवटी तेही उत्तम गाठी मारून, घट्ट बांधून ती बेचकी माझ्या हातात ठेवली. ती माझी स्वत:ची बेचकी पाहून मला इतका आनंद झाला की, मी माझ्याच नादात ती बेचकी घेऊन इकडे तिकडे दगड उडवत सुटलो होतो. अर्थात, कुणालाही लागणार नाही, याची काळजी घेऊनच. समजा तो दगड कुणाला लागलाच किंवा एखाद्याच्या खिडकीची

जरूर पाहा : अजिंठा-वेरूळ लेणी - अजिंठा, जि. औरंगाबाद - प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेली लेणी.

वार्षिक प्रायोजक - • श्री. प्रमोद वासुदेव जोशी, पुणे • असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., ९८६०४०४९९०, पुणे • बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे • श्री. अतुल कुलकर्णी, पुणे • एक हितचिंतक, पुणे

काच फुटली असती, तर मला ती बेचकी कायमची गमवावी लागली असती, याची मला पुरेपूर कल्पना होती. भैरूशी झालेली ओळख ही माझ्यासाठी जणू पर्वणीच होती.

बेचकी घडवताना बघितलेली नजाकत, दगड सोडताना झुप्पऽऽकन येणारा आवाज आणि एखाद्या बंदुकीच्या गोळीसारखा आकाशात उडणारा तो दगड हे सारं सारं मला फारच भावून गेलं होतं. मी रोज भैरूला भेटायचो. आता तो मला कुंपणाच्या आसपास हटकत नव्हता. उलट तोच मला कुठून कुठून विलायती चिंचा, बोरं, पेरू, शिंदीचे खजूर, बदाम असं आणून द्यायचा किंवा आम्ही एकत्र झाडावरून पाडायचो.

त्याच्याकडून मी झाडावर चढायला शिकलो आणि बेचकीनं अचूक नेम कसा साधायचा, हे शिकलो. झालंच तर सागरगोट्याच्या काटेरी आवरणातून आतले सागरगोटे बाहेर कसे काढायचे, लालसर पिवळ्या बदामाच्या आतला गर कसा काढायचा, विलायती चिंचा काढण्याचा आकडा कसा करायचा अशा निरुपयोगी का होईना; पण चार नवीन गोष्टी (म्हणजे सध्याच्या काळात बोलायचं झालं तर *'आऊट ऑफ द बॉक्स'*) शिकता आल्या. महिन्याभरात छान मैत्री झाली होती आमची.

एके दिवशी दुपार ओसरल्यावर मी आणि भैरू पेरू काढत होतो. तो मला पानांच्या गर्दीतला पेरू अचूक कसा टिपायचा, हे दाखवत होता. त्या पेरूच्या आसपासच पोपटांचा एक थवा होता. ते पोपट त्या फांदीशी खेळत होते. अशानं पेरूची ती फांदी पोपटांच्या खेळामुळं स्थिर राहात नव्हती. सारखीच हलायची.

त्यामुळं झालं असं की, भैरूला आला राग. रागानं तोंडातल्या तोंडात पुटपुटत त्यानं बेचकीची दिशा बदलली. मला त्या क्षणी जाणवलं की, हा आता त्यापैकी एका पोपटाला लक्ष्य करणार, तोच क्षणाचाही विलंब न करता मी त्याच्या

क्षितिज मोकळे तुला, पराक्रमास केवढे। मनात धैर्य ठेवुनी, झेप घे पुढे पुढे।।

वार्षिक प्रायोजक – • श्री. शशांक चांदोरकर, पुणे • डॉ. अमित हरताळकर, चोपडा, जि. जळगाव • श्री. सतीश शंकर कुलकर्णी, सातारा • सौ. सुमेधा अरूण केळकर, पुणे • श्री. रवींद्र पालेकर, पुणे

डाव्या हाताला धक्का दिला.

पोपटावर नेम धरून साधलेला तो दगड भलतीकडेच जाऊन आपटला. माझ्यामुळे आज एका पोपटाचा जीव वाचला होता; पण माझ्या त्या कृतीमुळे भैरूला संताप आला होता. त्यानं त्याच संतापाच्या भरात मला जोराचा धक्का दिला आणि हातातला अजून एक दगड बेचकीला लावून माझ्यावर नेम धरला. मी पूर्ण बेसावध असल्यामुळे खाली पडलो होतो. आता तो दगड माझ्यावर आदळणार असं वाटत असतानाच तो झुप्पकन शेजारच्या मातीत घुसला.

मी उठून उभा राहिलो. भैरूनं मला इजा केली नव्हती. तो थोडा शांत झाल्यावर मी त्याला म्हणालो, ''भैरू, तुला एवढं चिडायला काय झालं? तू उगाच त्या पोपटाला मारणार होतास. त्या पोपटाची काय चूक होती त्यात?''

''चूक कुनाचीच नवती. पन माझा राग तुझ्यावर निघला. तुला लागलं नाय ना कुटे?'' मी नकारार्थी मान फिरवली. तोच भैरू उठला आणि झपझप त्या पेरुच्या झाडावर चढला आणि पाच-सहा पेरूंसकट तो खाली आला. ते सगळे पेरु माझ्या हातात देत म्हणाला, ''हे घे हे माझ्याकडून तुला.'' इतकं बोलून तो पुढे काही न बोलता त्याच्या वस्तीकडे धावत सुटला. मी त्याला अजिबात अडवलं नाही. शब्दात न बोलता भैरूनं दिलगिरी व्यक्त केली बहुतेक! *सॉरी* हा शब्द महत्त्वाचा नसतोच मुळी... महत्त्वाची असते ती त्यानंतरची भावना! ती समजली की झालं!! भैरूनं दिलेले पेरू घेऊन मी शांत मनानं घरी आलो.

दुसरा दिवस उजाडला. मी शाळेत गेलो असताना घरी कोणीतरी पाहुणे आले होते. त्यांच्यातल्या एका मुलानं माझ्या बेचकीची मोडून तोडून पार वाट लावली होती. ज्याने कुणी बेचकीची ही अवस्था केली होती, तो जर मला दिसला असता; तर त्याच बेचकीनी ताणलेला दगड त्याच्याच डोक्यात घातला असता मी! मला काही सुचेना... शाळेचा गणवेश काढण्याचं भानही मला राहिलं नाही आणि मी ती तुटकी बेचकी घेऊन तडक भैरूच्या दिशेनं निघालो. मी कुंपणाजवळ येऊन थांबलो, हाका मारल्या; पण एक ना दोन. भैरू बाहेर आलाच नाही. वास्तविक तो इथेच आसपास असायचा. तेवढ्यात माझ्या मागून एक बाई वस्तीच्या दिशेने जाताना मला दिसली. मी तिच्याकडे धावलो आणि तिला भैरुबद्दल विचारलं. त्यावर ती म्हणाली, ''भैरू... त्ये बारकं कारटं व्हय?''

मी 'हो' म्हणालो.

''ह्ये बग बाळा, काल रातीला त्या वस्तीत भांडाभांड झालीया. तुझ्या भैरुचा बाप पन हुता त्यात. त्याच्या बापावर कुनीतरी हात उगारला, तर ह्या कारट्यानं अशाच एका बेचकीनं त्या मानसाचं डोकंच फोडलं. डोळा वाचला; पन हास्पिटलात घेऊन गेले त्याला. मंग भैरूचा बाप थांबलाच नाई त्या वस्तीत. आनि रातच्यालाच आपल्या बायकापोराला घेऊन कुठंतरी निगुन गेला. शाना आससील तर त्याचं नाव घेऊन परत इते येऊ नको.'' असं म्हणून ती बाई तिच्या वाटेला निघून गेली.

मी मात्र तसाच तिच्या दिशेनं पाहात पुतळ्यासारखा उभा राहिलो. 'म्हणजे भैरू आता परत कधीच भेटणार नाही का? का येईल तो परत काही दिवसांनी?' खूप वाईट वाटलं मला त्यावेळेस; पण तरी मी पुढचा किमान आठवडाभर त्या

जरूर पाहा : कान्हेरी लेणी - बोरिवली, जि. मुंबई - काळ्या कातळाकासून तासून बनवलेली लेणी.

वार्षिक प्रायोजक - • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे • श्री जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे • श्री. संतोष साटम, पुणे • श्री. साहिल कोठारी, बारामती • श्री. अमित बागाईतकर, पुणे

कुंपणाच्या आसपास भटकत राहिलो. न जाणो कदाचित भैरू दिसेलही! तो त्या आठवड्यात काय पण पुढच्या महिन्याभरातही दिसला नाही. मला कळेना की, मला नक्की वाईट कशाचं वाटतंय? भैरू भेटणार नाही याचं, का माझी बेचकी परत दुरुस्त होणार नाही याचं? कदाचित दोन्ही गोष्टींचं...

मी माझी बेचकी नंतर परत कधीच दुरुस्त केली नाही. भैरूची आठवण म्हणून मी ती जपून ठेवणार होतो. भैरूनं दोऱ्यानी विणलेलं कापड आता परत बघायला कुठं मिळणार होतं?

बालपणीचे ते दिवस संपले. ती तुटलेली बेचकीही आता कुठं गेली आठवतसुद्धा नाही. ज्या बोरांमुळे मला भैरू भेटला त्या बोरीच्या जाळीत मी आजही अधूनमधून शिरतो... बोरांचा हंगाम असला काय अन् नसला काय!! पण लगेचच एक विचार मनात येतो आणि घसा दाटतो. पुढच्यावर्षी हे झाड बोरांनी पुन्हा बहरेल पण भैरू...???

***

– अमोल बापट

amolbapat@gmail.com

वाचूया – कथा
आन्दाच्या करामती
ले. कै. हरिहर आठलेकर

गरजणारा कप

विज्ञान प्रयोग

साहित्य : कागदी कप, काडेपेटीची काडी, दोरा (४०-५० सें.मी.)

कृती : १. कागदी कपाच्या तळाला काडीने छिद्र करा. २. दोऱ्याचे एक टोक काडीच्या मध्यभागी गुंडाळून गाठ मारा. ३. दुसरे टोक कागदी कपाच्या छिद्रातून आत घालून, काडी कपाच्या तळाशी राहील आणि यामुळे दोरा कपाच्या बाहेर येईल असे बघा. ही झाली प्रयोगाची रचना. ४. आता एका हातात कप धरून दुसऱ्या हाताने बाहेरील दोऱ्यास ताण देऊन ओढा. यातून काही ध्वनी/आवाज निर्माण होतोय का याचे निरीक्षण नोंदवा. ५. हीच कृती तुमचे बोट पाण्यात बुडवून मग करा. काही फरक जाणवतो का? तुमचे निरीक्षण नोंदवा.

काय घडलं? : बोट ओले करून दोरा ओढल्यावर, गर्जना केल्यासारखा ध्वनि निर्माण होतो.

असं का घडलं? : कोणताही ध्वनी निर्माण होण्याचे कारण कंपन असतात. आपण बोलताना जर गळ्यापाशी हात ठेवला तर ती कंपनं आपल्याला जाणवतात. जेव्हा आपण बोट ओलं करतो, तेव्हा पाण्यामुळे आपलं बोट घसरतं आणि आपण दोरा घट्ट पकडण्याचा प्रयत्न करतो. या घसरणे-पकडणे या क्रियेमुळे कंपनं निर्माण होतात. जी दोऱ्यातून काडीला मिळतात. हीच कंपनं काडी कपाच्या तळाला देते. या कंपनांनी निर्माण होणारा आवाज कपाच्या आकारामुळे आणखी मोठ्याने ऐकू येतो.



१ २ ३ ४ ५

– शुभम् अग्निहोत्री, ज्ञान प्रबोधिनी, युवक विभाग, पुणे

दृष्टी

डॉ. संगीता गोडबोले

मोठे मोठे डोळे,
हरिणी पाडसाचे,
तसे माझ्या छकुलीचे,
अनुराणीचे...

माझ्या लेकीला लहानपणी झोपताना रोज ही ओवी लागायची. त्यातलं नेमकं काय आवडायचं तिला, कोण जाणे. त्या ओवीची चाल आवडायची, त्यातल्या टपोऱ्या डोळ्यांचा उल्लेख आवडायचा की, तिचं नाव आलेलं आवडायचं... हे अजूनही न उलगडलेलं कोडं आहे.

काल जुलाबानं हैराण होऊन शरीरातील पाणी कमी झाल्यामुळे *ॲडमिट* केलेलं, डोळे खोल गेलेलं बाळ आज सकाळच्याला ओठांनीच नाही, तर डोळ्यांनीही हसत होतं, तेव्हा इतका आनंद झाला मला!

त्याच्या आईच्या डोळ्यांत न मावणारी कृतज्ञता पाहिली, तेव्हा काल देवाला दूषणं देणाऱ्या तिच्या डोळ्यात पुन्हा एकवार देवाबद्दलचा विश्वास दिसला मला.

डोळ्यांशी किती खोलवर घट्ट नातं असतं ना आपलं... डोळ्यांत सौंदर्य टिपणारी नजर असते, सृष्टी सामावणारी दृष्टी असते.

डोळ्यांमधे भाव असतात, उद्याची स्वप्नं असतात. डोळ्यात करार असतो, लपवलेलं दुःख असतं अन् न मावणारं प्रेमही असतं. ...मौनातूनही सिद्ध होणारी डोळ्यांची परिभाषा असते, ती समजायला मात्र एक संवेदनशील मन लागतं...

शांत सागरासारखे निळे डोळे, हिरव्या रंगाचे लबाड डोळे, घारे बेरकी डोळे अन् काळेभोर करारी डोळे ...वाट पाहाणारे आर्त डोळे अन् दुसऱ्याच्या वेदनेने पाणावलेले डोळे...

...विविधरंगी पानं, फुलं, शुभ्र आकाश, सूर्योदय अन् सूर्यास्त ...साऱ्या रंगांची मुक्त उधळण पाहाता येणं हे देवाचं देणं आणि डोळ्याचे पारणे फिटवणारे प्रसंग आयुष्यात येणं हेही दैवाचं देणं...

कधी उघड्या डोळ्यांनाही जे दिसत नाही, ते मिटल्या डोळ्यांना दिसतं. मनःचक्षूंनी टिपलेली, मनःपटलावर उमटलेली छबी पुसून टाकणं; हे मोठं जिकिरीचं काम! अशक्यच म्हणा ना!!

'डोळे असून आंधळा' अशी कितीकांची अवस्था

जरूर पाहा : कार्ला लेणी – कार्ला, जि. पुणे – मोठ्या संख्येने चैत्यगृह (बौद्ध संतांची समाधी) असलेली लेणी.
वार्षिक प्रायोजक – • 'संतुल'श्री. मिलिंद संत, पुणे • चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे
• श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे. सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायं.), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

असते.. तर एरिक व्हेएनमायरसारखा नेत्रहीन जेव्हा एव्हरेस्ट पादाक्रांत करतो तेव्हा 'डोळे नसून डोळस तो' ...असं मान्य करण्याची वेळ येते. समोरच्याला किती सहजपणे आंधळं म्हणून जातो आपण...

फसतात सावल्यांना
हा दोष आंधळ्यांचा...
संपेल ना कधीही
हा खेळ सावल्यांचा...

एका अंधशाळेत झालेल्या कार्यक्रमात या ओळी म्हणून झाल्याक्षणी झालेली कानकोंडी सुधीर मोघेंनी गप्पांच्या ओघात सांगितली होती, ते स्पष्ट आठवतंय मला.

परवा भावानं आणि वहिनीनं नेत्रदानाचा फॉर्म भरल्याचं सांगितलं. आपल्या माघारी दोन जणांना दृष्टी लाभावी हा विचार किती थोर..

दृष्टीसमोर न येणाऱ्या सुखाच्या मृगजळामागे धावत सारं आयुष्य खर्ची घालायचं, सुखाचा शोध घेत ऊर धपापेपर्यंत धावायचं अन् ज्या सुखाच्या शोधात इतके धावलो ते तर आपल्या कुशीतच असतं की! हे सत्य उमगलं; तेव्हा मात्र दिव्य दृष्टी लाभल्याचा आनंद त्यांच्या डोळ्यांतून ओसंडून वाहताना दिसला मला...!

***

डॉ. संगीता गोडबोले
sgodbolejoshi@gmail.com

विज्ञान प्रयोग

उमलणारे फूल

साहित्य : वर्तमानपत्र, कात्री, ताट, पाणी

कृती : १. वर्तमानपत्र किंवा कोणताही कागद फुलाच्या आकारामध्ये कापून घ्या.
२. हे फूल तयार झाल्यावर फुलाच्या पाकळ्या आतल्या बाजूला दुमडून घ्या.
३. आता एका ताटामध्ये पाणी घ्या.
४. फुलाच्या पाकळ्या वरच्या बाजूला असतील अशा स्थितीत ते पाण्यात ठेवा.

काय घडलं? – फूल पाण्यात ठेवल्यावर लगेच पाकळ्या उघडतात. जणू काही ते फूल उमलत आहे...

असे का घडतं? – कागद पाणी शोषून घेतो. पाण्याचे कण एकमेकांना खेचायचा प्रयत्न करतात. जे पाणी कागदाने शोषून घेतले आहे त्या पाण्याला ताटामधील पाणी स्वत:कडे ओढायचा प्रयत्न करते, त्याचवेळी कागदावरील पाणी कागदावरच राहायचा प्रयत्न करते. म्हणून त्याबरोबरच कागदही ओढला जातो.



– शुभम् अग्निहोत्री
ज्ञान प्रबोधिनी, युवक विभाग, पुणे

वार्षिक प्रायोजक – • डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, शेफिल्ड, यु.के. • डॉ. जयेश राहाळकर, पुणे • श्री. विद्यानंद देवधर, कोल्हापूर • श्री. अंबरीश देशमुख, पुणे • एक हितचिंतक, पुणे

मुंग्यांचा मार्ग शोधा

आपल्यापैकी सगळ्यांनीच पाहिले असेल की, मुंग्या कशाप्रकारे मार्गक्रमण करतात. त्या एकामागे एक अशा प्रकारे एक लांब रांग तयार करून चालतात. बऱ्याचदा तर त्या एकमेकांच्या डोक्यांना चिकटतात.

तुम्ही कधी असा विचार केला आहे का, की या सगळ्या मुंग्या एकमेकांशी संवाद साधत असतील का?

जसे की अन्नकण कुठे आहेत? आहे त्या जागेपासून ते किती लांब आहेत? त्या मार्गामध्ये कुठले अडथळे आहेत? इ.

या कुतूहलामुळे आपण या प्रयोगामध्ये मुंग्यांच्या वर्तणुकीचा अभ्यास करणार आहोत...

काय करावे?

१. थोडीशी साखर किंवा कुठलाही गोड पदार्थ तुच्या घरात एखाद्या योग्य जागेवर ठेवा.
२. थोड्या वेळाने मुंग्या त्या साखरेच्याभोवती गोळा होतील. अजून थोड्या वेळानंतर तुम्हाला एक मुंग्यांची रांग पाहायला मिळेल.
३. आता आपण या मुंग्यांच्या रांगेचे निरीक्षण करून, त्यांच्या वर्तणुकीचा अभ्यास करणार आहोत.
४. त्या मुंग्यांच्या रांगेमध्ये कागदाचा कपटा टाकून किंवा कुठलाही अडथळा निर्माण करा.
५. आता त्या मुंग्या काय करतात त्याचे निरीक्षण करा. मुंग्या त्यांचा मार्ग बदलतात की नाही?

आता तुम्ही खालील निरीक्षणे नोंदवा.

निरीक्षणे –

- मुंग्यांच्या रांगेची अंदाजे संपूर्ण लांबी किती?
- किती अंतरावर तुम्ही अडथळा ठेवला?
- अडथळा तयार केल्यावर किती वेळाने मुंग्यांनी त्यांचा मार्ग बदलला.
- एकच नवीन रांग तयार झाली, का अनेक रांगा तयार झाल्या.

आता तो अडथळा काढा आणि पुन्हा निरीक्षणे नोंदवा.

- मुंग्या तोच मार्ग ठेवतात की परत त्यांच्या मूळ मार्गावर येतात? (अडथळा तयार करण्याआधीचा)
- जर मुंग्यांनी मार्ग बदलला असेल तर त्यांना त्यांच्या मूळ मार्गावर यायला किती वेळ लागला?
- त्या मुंग्या नवीन आणि जुन्या अशा दोन्ही मार्गावरून जातात का?
- मार्गातील अडथळा काढल्यावर तुम्हाला किती रांगा दिसल्या?
- तुम्ही यामध्ये काही सुसूत्रता अनुभवली का?

करून तर पाहा...

१) जर आपण अडथळा ठेवल्यानंतर अन्नकणाची दिशा बदलली तर काय होईल?
२) मुंग्यांच्या मार्गामध्ये आपण अनेक अडथळे निर्माण केले तर काय होईल?
३) यांपैकी एका अडथळ्याची जागा बदलली तर काय होईल?

(मुग्यांना इजा पोहोचणार नाही याची काळजी घ्या.)

***

– **रिषभ बागवडे**, bmrishabh@gmail.com

जरूर पाहा : **कुडा लेणी** – कुडा, जि. रायगड – समुद्रकिनाऱ्याजवळील टेकडीमध्ये कोरलेली लेणी.

वार्षिक प्रायोजक – • श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५/९८२२०८९४६३
• डॉ. नीरज रायते, पुणे • श्री. संजय प्रधान, सातारा • सौ. स्मिता चावरे, नवी मुंबई

आठवणीत राहिलेली स्पर्धा

ललित

– सायली कुलकर्णी

एका हातात *ट्रॉफी* आणि एका पायाला बांधलेले बँडेज बघून आज मला खरंच छान वाटत होतं. गेले दीड-दोन महिने मी तहान-भूक सगळं विसरून फक्त आणि फक्त आंतरशालेय नृत्यस्पर्धेचा विचार करत होते. खरंतर भरतनाट्यमचा *क्लास* लावून मला फक्त सहा महिने झाले होते आणि माझा उत्साह आणि प्रगती पाहून 'तांडव-लास्य' या *थीम*मध्ये मुख्य भूमिकेसाठी सरांनी चक्क माझी निवड केली होती.

आई गमतीनं म्हणाली देखील, "तुझ्या सरांना कसं गं माहिती की, तू घरी पण तांडवच करत असतेस ते? अगदी योग्य निवड केली आहे, तांडवासाठी तुझी."

सरांनी मला नटराजाच्या वेगवेगळ्या मुद्रा दिल्या होत्या. चतुर्भुज नटराज, जटाधारी नटराज इत्यादी. त्या मुद्रांमध्ये अपेक्षित असलेले भाव सरांनी सांगितले होते.

नटराजाची मूर्ती आणि 'ओम' यांचंही साधर्म्य सरांनी खूप छान समजावून सांगितलं होतं. नृत्य करत असताना एवढ्या गोष्टींचा कधी खोलवर विचारच केला नव्हता.

त्यादिवशी *क्लास* संपल्यावर याच विचारात मी घरी आले. 'काय काय केलं की, या सगळ्या मुद्रा मला नीट करता येतील व पंधरा सेकंद *होल्ड* करता येतील?' त्याच्यासाठीच फार मेहनत घ्यावी लागत होती. त्या मुद्रा मला नीट याव्या म्हणून मी त्याचा सराव करत होते.

झोपेतही मी त्याचा सराव करत असताना आईला चुकून माझा पाय चांगलाच जोरात लागला. दिवस-रात्र मला या नृत्याच्या सरावाने झपाटून सोडलं होतं.

सर फारच कडक शिस्तीचे होते. त्यांना थोडासुद्धा उशीर झालेला चालत नसे. नऊचा *क्लास* असेल, तर घुंगरू बांधून तुम्ही पावणेनऊला हजर पाहिजे. रविवारी शाळेला

सुट्टी असल्याकारणाने सरांनी जास्तीचा सराव ठेवला होता. त्यादिवशी *क्लासला* जाताना माझ्या सायकलचं *टायर पंक्चर* झालं. कशीबशी मी नऊला *क्लासमध्ये* पोहोचले, तर सरांनी *क्लासच्या* बाहेर मला उभं केलं आणि सांगितलं, 'आज बाहेरूनच शिकायचं!' शिस्त म्हणजे शिस्त.

मधुरा– माझ्या मैत्रिणीला वाटलं की, आता मुख्य भूमिका तिलाच करायला मिळणार! मलासुद्धा एक क्षण अगदी असंच वाटून गेलं होतं; पण बाहेर उभं राहून का होईना, मी सरांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी तंतोतंत पाळल्या. जाताना सरांची माफीदेखील मागितली. पुढच्यावेळी मी पंधरा मिनिटं आधीच *क्लासमध्ये* हजर होते. सरांनी सांगितलेल्या सर्व मुद्रा मी छान केल्या. आणि मुख्य भूमिका ठरल्याप्रमाणे माझ्याकडेच राहिली. खरंतर मी खूप दमले होते; पण सरांची शाब्बासकी मिळवण्यासाठी आम्ही सर्वजणी धडपडत होतो. घरातूनही सगळ्यांचा पाठिंबा होताच. घरच्यांच्या मदतीनं माझी जय्यत तयारी चालू होती.

आणि अखेर तो दिवस उजाडला. त्यादिवशी आमची आंतरशालेय नृत्यस्पर्धेची अंतिम फेरी होती. सगळ्याच शाळांनी खरंच खूप मेहनत घेतली होती. मात्र आमची *थीम* एकदम भारी होती, *युनिकच* होती म्हणाना! आमची *थीम* होती– तांडव व लास्य! तांडव– ज्या नृत्यामुळे सर्व दिशा थरथर कापायला लागतात, जे नृत्य विश्वाच्या जन्माचे व अंताचेही कारणीभूत आहे, असे शिवाचे नृत्य.

भगवान शिवानं केलेलं जगातील पहिलं पुरुषप्रधान नृत्य म्हणजे तांडव. तांडवामध्ये सर्व हालचाली या जोरकस आणि वेगवान असतात, हेच तांडवाचं मुख्य वैशिष्ट्य. वीररस, रौद्ररस, भयानकरस, अद्‌भुतरस यांचा तांडवात समावेश असतो. तांडव नृत्य सादर करताना डमरू, नगारा, शंख अशी विविध वाद्यं वाजवली जातात.

तर लास्य म्हणजे स्त्रियांनी केलेलं सुकुमार नृत्य. अतिशय नाजूक, हळुवार अशा हालचालींनी युक्त असं हे स्त्रीप्रधान नृत्य. शृंगाररस, हास्यरस इत्यादी रसांचा यात समावेश केलेला असतो. तांडव–लास्याच्या ह्या

जरूर पाहा : खरोसा लेणी – खरोसा, जि. लातूर – जांभ्या दगडामध्ये कोरलेली लेणी.

वार्षिक प्रायोजक – • डॉ. विनायक देसूरकर, पुणे • डॉ. संजय गद्रे, धुळे • श्री. राहुल भिडे, पुणे • श्री. सचिन उल्हास गाडगीळ, पुणे • एक हितचिंतक, नाशिक – कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ

जुगलबंदीत शेवट हा तांडव नृत्याने करत भगवान शंकर जिंकतात अशी नृत्यसंरचना होती. यामध्ये शेवटच्या कडव्यामध्ये मला गुडघ्यांवर गोल-गोल असे तीन *राऊंड स्टेजला* मारायचे होते. गोल-गोल फिरत शेवटी उभे राहून नटराजाची मुख्य मुद्रा पंधरा *सेकंद होल्ड* करायची होती. गुडघ्यावर गोल फिरण्याचा मी भरपूर सराव केला होता. गुडघ्यांवर *नी-कॅप* बांधली होती.

पण अगदी शेवटचं कडवं राहिलं असताना घुंगराच्या आतमधला मणी बाहेर आला आणि माझ्या टाचेला जोरात लागला. इतक्या जोरात लागला की, माझ्या पायातून रक्त येऊ लागलं. आणि मी कळवळले. मला सहनच होईना. असं वाटलं, 'आता आपण काही नाचू शकत नाही.' पायाला झालेली जखम, होणाऱ्या वेदना, अंगावर चढवलेला एवढा मोठा पोशाख त्याचं वजन, घुंगरांचं वजन, हातात धरलेलं त्रिशूळ या सगळ्यांमुळे माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली. काय करावं काही सुचतच नव्हतं.

माझी सगळी शक्ती, सगळी सकारात्मकता पणाला लावली. 'काहीही झालं तरी आपण ही शेवटची नटराजाची मुद्रा करायचीच,' असा निश्चय केला.

आपल्या शाळेची मान खाली जाईल असं अजिबात होऊ द्यायचं नाही. त्याक्षणी माझ्या डोळ्यांसमोर झरझर दीड-दोन महिन्यांचा प्रवास तरळून गेला. सरांची मेहनत दिसत होती. हे आणि असे अनेक विचार एकदम माझ्या मनात येत होते आणि त्या माझ्या लागलेल्या पायाकडे दुर्लक्ष करत मी उभी राहिले.

गाण्याचे बोल माझे मनोधैर्य वाढवत होते. आणि मी शेवटची नटराजाची *पोझ* घेतली आणि नुसती घेतली नाही तर पंधरा सेकंद मी ती *होल्डदेखील* केली. जणू काही नटराज मला वरून आशीर्वाद देत होते, आत्मिक आनंद मिळत होता, आंतरिक ऊर्जा मिळत होती. जणू स्वत: नटराज माझ्या अंगात संचारले होते आणि माझ्याकडून तांडव नृत्य करून घेत होते.

कुठून एवढं बळ आलं होतं, मला माहीत नाही; पण मी सर्व जिद्द पणाला लावली आणि शेवटपर्यंत नृत्य करत राहिले.

आता फक्त पंधराच मिनिटात स्पर्धेचा निकाल लागणार होता. ती पंधरा मिनिटं मी कशी काढली, हे माझं मलाच माहीत होतं.

जेव्हा मी विंगेत गेले, तेव्हा माझ्या पायाकडे बघत सर म्हणाले,

''टेक केअर. वेल डन.'' आणि माझ्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. त्याक्षणी मला असं वाटलं की, 'आज *ट्रॉफी* मिळाली नाही तरी चालेल; पण सरांचा आशीर्वाद कायम माझ्याबरोबर असाच राहो.'

अंतिम निकालाची घोषणा झाली; आमच्या नृत्याला पहिला क्रमांक मिळाला होता आणि आमच्या शाळेला *ट्रॉफी* मिळाली. सगळ्यांच्या कौतुकाचा वर्षाव माझ्यावर होत होता. रात्री घरी आल्यावर माझ्या जखमेकडे बघून आणि हातातल्या *ट्रॉफीकडे* बघून 'एका डोळ्यात हसू, तर दुसऱ्या डोळ्यात आसू' अशी माझी अवस्था झाली होती...!

***

- सायली कुलकर्णी
ए-१/१, सरितानगरी, फेज २,
सिंहगड रस्ता, पुणे 411030

दया, क्षमा नि शांती, त्यागाची महती मोठी। त्यागूया क्षुद्रपणाची नि कठोरतेची वृत्ती।।

वार्षिक प्रायोजक - • श्री. सागर सुराणा, पुणे • श्री. निखिल आपटे, पुणे • श्री. संजय रिसबूड, पुणे
• श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु - कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ. • श्री. नागेश साने, पुणे

वाचलेच पाहिजे असे काही



तीन हजार टाके

सामान्य व्यक्ती... असामान्य जीवन...

– नीलिमा करमरकर

'तीन हजार टाके'
सामान्य व्यक्ती...असामान्य जीवन...
या पुस्तकाच्या लेखिका सुधा मूर्ती! *कॉम्प्युटर सायन्स* विषयातील तज्ज्ञ अभियंता, 'इन्फोसिस फाऊंडेशन'च्या माध्यमातून तळमळीने काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आणि अनुभवांना प्रतिभेची जोड देत दर्जेदार, सकस लेखन करणाऱ्या लेखिका हे त्यांच्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचे अनेक पदर!

'इन्फोसिस फाऊंडेशन' या संस्थेचे काम करत असताना समाजातील विविध प्रकारच्या घटकांसोबत त्यांचा परिचय झाला. अनेक व्यक्तींचं जगणं त्यांना समजून घेता आलं. या पुस्तकातल्या बहुतेक कथा या सत्य घटनांवर आधारित आहेत. काही हलक्याफुलक्या तर काही माणसांच्या वेदना व जीवनसंघर्ष सांगणाऱ्या!

सुधा मूर्ती यांनी त्यांच्या खास शैलीत, त्यांचं निरीक्षण नेमक्या पद्धतीनं मांडत आणि सकारात्मक प्रेरणा देत या कथा लिहिल्या आहेत.

'तीन हजार टाके' या कथेत देवदासींच्या समस्या सोडवण्याचं काम हाती घेतल्यावर आलेले अनुभव आहेत. देवदासींना देहविक्रयाच्या व्यवसायातून मुक्त करून, स्वत:च्या पायावर उभं राहून स्वतंत्रपणे जगायला या फाऊंडेशनने मदत केली. या देवदासींनी तीन हजार टाके घालून, प्रत्येकीची थोडीशी कलाकुसर असलेली गोधडी सुधा मूर्ती यांना कृतज्ञतापूर्वक भेट दिली. ही होती हृदयाकडून हृदयाला मिळालेली भेट!

'मुलांवरती मात' या कथेत स्वत: लेखिका अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेते. सबंध महाविद्यालयात एकटीच मुलगी! मुलांनी केलेली छेडछाड व इतर समस्यांना तोंड देत, अभ्यासात अत्युच्च पद प्राप्त करत एक इतिहास घडवते. ही कथा वरकरणी गंमतशीर, हलकीफुलकी वाटली तरी लेखिकेचा निग्रह, ध्येय गाठण्यासाठी केलेली मेहनत, मनात कोणतीही कटुता न ठेवता स्वत:चं निर्माण केलेलं स्थान यामुळे मनाला भिडून जाते.

मोठेपणी वाराणसी येथे गंगा नदीला भेट दिल्यावर काशीयात्रेची अपूर्ण इच्छा मनात ठेवणाऱ्या आजीची आठवण लेखिकेला येते. त्यातूनच 'तीन ओंजळी पाणी' ही कथा जन्म घेते. गंगेच्या प्रवाहात लेखिका आवडत्या गोष्टींचा त्याग करून निर्मोही होते, या प्रसंगाने शेवट होतो.

लंडनच्या विमानतळावर लब्धप्रतिष्ठित स्त्रियांकडून त्यांची अवहेलना होते; कारण त्या स्त्रिया लेखिकेला ओळखतंच नसतात. साधी राहणी, उत्तम आचारविचार असलेल्या सुधा मूर्ती 'कॅरल क्लास' कथेत हसत खेळत समाजातील विशिष्ट वर्गावर भाष्य करतात.

'खरा राजदूत' या कथेत

जरूर पाहा : त्रिरश्मी लेणी - जि. नाशिक - 'पांडव लेणी' म्हणून ही लेणी प्रसिद्ध आहेत.

वार्षिक प्रायोजक – • सौ. प्राची व श्री. अमर परांजपे – सांगली • सौ. मानसी मराठे, पुणे
• सौ. किरण मुसळे – कुलकर्णी, सातारा • श्री. अनिल रिसबूड, पुणे • श्री. किशोर पंडित, चेंबुर, मुंबई

लेखिकेचं हिंदी चित्रपटांवरील प्रेम दिसून येतं. लेखिका विविध देशांना भेटी देते. तेव्हा तिथल्या जनमानसावर असलेला हिंदी चित्रपटांचा प्रभाव त्यांना जाणवतो. आणि हे चित्रपट हा आपला 'खरा राजदूत' असल्याचं त्या गमतीने म्हणतात.

कर्नाटकातील लेखिकेचं मूळ गाव, तिथली माणसं, नातेवाईक, खाद्यपदार्थ, रूढी-परंपरा आणि एकूणच भारतीय संस्कृतीबद्दल त्यांना वाटणारं प्रेम पदोपदी जाणवतं. या कथा मानवी स्वभावाचं सौंदर्य आणि त्याचं घृणास्पद स्वरूप दोन्ही उघडं करून दाखवतात.

इन्फोसिस फाऊंडेशनचं काम करत असताना आलेले अनुभव त्यांनी कथांच्या स्वरूपात त्यांच्या स्वच्छ, निर्मळ, प्रवाही शैलीत मांडले आहेत. भारतीय भाज्यांचं मूळ स्थान, वडिलांचा प्रेमळ स्वभाव, मद्यपी लोकांच्या जीवनातील 'आशेचा किरण' असे विषयसुद्धा त्यांनी या कथांतून हाताळले आहेत. हिंमत आणि धैर्य दाखवून केलेल्या लहानशा गोष्टी इतरांच्या जीवनाला स्पर्शून जातात, हे आपल्याला या कथांमधून दिसून येतं.

दैनंदिन जीवनातील संघर्ष आणि यश त्या परिणामकारकरित्या आपल्यासमोर उलगडतात. सकारात्मक संदेश देणाऱ्या या कथा लहानथोर सर्वांना आवडतील अशा आहेत. अर्थपूर्ण मुखपृष्ठ पुस्तकाला लाभले आहे.

पुस्तकाचे नाव : तीन हजार टाके
मूळ कन्नड लेखिका : सुधा मूर्ती
मराठी अनुवाद : लीना सोहोनी
प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस
पृष्ठसंख्या : १६२ किं.: ₹ १७०/-

***

- नीलिमा करमरकर
५०१, 'रेनेसान्स, डॉ. केतकर रस्ता
प्रभात रस्ता, पुणे - ४

लेफ्टनंट कर्नल कार्लेकर रेल्वे स्टेशनवर उतरले. त्यांनी पाठविलेला संदेश मिळाला नसल्याने, त्यांना जीप घ्यायला आलेली नव्हती. त्यांनी छावणीत फोन केला,

''मै मुंबईसे कार्लेकर आया हूँ। जीप भेज दो।''

सैन्यात प्रत्युत्तर करायचा रिवाज नसल्याने उपस्थित जवानाने ''जी साब'' असे म्हणून फोन ठेवला. एक तास उलटून गेला तरी जीपचा पत्ता नसल्याने ले. कर्नल कार्लेकरांनी पुन्हा फोन केला व ते संतापाने म्हणाले, ''जीप अभी तक क्यों नहीं भेज दी गयी?'' तो जवान कसाबसा उत्तरला, ''साब अगर आप 'कार लेकर' आए हैं, तो भी आपको जीप क्यों चाहिए? यहीं मै एक घंटेसे सोच रहा हूँ।''

वार्षिक प्रायोजक - • डॉ. कीर्ती आपटे, पुणे • सौ. सारिका फाटक, पुणे • श्री. विनोद कुलकर्णी, पुणे • श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे • डॉ. वर्षा बखले, चेंबुर, मुंबई • श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

स्वयं शोध चाचणी ५– समय नियोजन कौशल्य – २

या चाचणीतील प्रश्नांचे उत्तर देताना, नेहमीच /कधीतरी /क्वचित /कधीच नाही यांपैकी कोणतातरी एक पर्याय निवडा आणि त्यासाठी खालील गुण देण्याच्या पद्धतीनुसार त्या प्रश्नांपुढे गुण द्या. हे काम प्रामाणिकपणे करा.

प्रश्न	गुण देण्याची पद्धत – नेहमीच – ४ , कधीतरी – ३, क्वचित – २ , कधीच नाही – १	गुण
१.	माझ्या दिनक्रमाचे मी नियोजन करतो/करते का?	
२.	दुसऱ्या दिवशी दिवसभरात मी कायकाय करणार आहे हे आदल्या दिवशी झोपण्यापूर्वी मला स्पष्ट असते का?	
३.	शाळेतील व घरातील वर्षभरातील महत्त्वाच्या कार्यक्रमांची नोंद घेऊन मी माझे वार्षिक नियोजन करते/करतो का?	
४.	वेळेचे नियोजन करताना मला काय साध्य करायचे आहे, असे उद्दिष्ट मी मांडते/मांडतो का?	
५.	स्वतःच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून माझ्या वेळेची आखणी मी करते/करतो का?	
६.	नियोजनाप्रमाणे गोष्टी करताना माझ्या मन:स्थितीचा अडथळा येणार नाही यासाठी मी प्रयत्न करते/करतो का?	
७.	नियोजनाप्रमाणे गोष्टी होत नसतील तर त्यांची कारणे मी समजून घेते/घेतो का?	
८.	नियोजनाप्रमाणे गोष्टी होत नसतील तर त्यात येणाऱ्या अडथळ्यांवर मी उपाय शोधते/शोधतो का?	
९.	नियोजनाप्रमाणे गोष्टी न होण्यामध्ये स्वतःचा स्वभाव, सवयी आड येतात त्या बदलण्याचा मी प्रयत्न करते/करतो का?	

एकूण

वरील चाचणी सोडवून गुणांची बेरीज करा. तुमचे समय नियोजन कौशल्य वाढवण्यासाठी तुम्हाला मिळालेल्या गुणांनुसार पुढे काही कृती करायला सुचवल्या आहेत, त्या अवश्य करा.

१८ पेक्षा कमी गुण – कोणकोणत्या गोष्टींमुळे वेळ वाया जातो असे तुम्हाला वाटते त्याची यादी करा. त्यातील २-३ गोष्टी कमी करण्याचा प्रयत्न करा.

१८ ते २७ मधील गुण – सर्वांगीण विकासासाठी कोणकोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत याबाबत आई-वडील-शिक्षक यांच्याशी बोलून यादी करा. त्यातील २-३ गोष्टी तरी तुमच्या नियोजनात बसवण्याचा प्रयत्न करा.

२७ पेक्षा जास्त गुण – वर्षभरात कोणत्या गोष्टी साध्य करायच्या आहेत, कोणती उद्दिष्टे पूर्ण करायची आहेत त्यांची यादी करा. त्या उद्दिष्टांची महिनावार फोड करा आणि ते साध्य होण्यासाठी वेळापत्रकात आवर्जून वेळ राखून ठेवा.

प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २०/१२)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी! या निमित्ताने तुम्ही अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

प्रश्नांची उत्तरे लिहा –

१) डोळ्यांची परिभाषा समजायला आपल्याजवळ काय असावे लागते, असे लेखिकेला वाटते. (संदर्भ : लेख दृष्टी)

२) 'मित्र' म्हणून भैरूची कोणती स्वभाव वैशिष्ट्ये तुम्हाला भावली? का?

३) 'आंतरशालेय नृत्यस्पर्धा' लेखिकेच्या का स्मरणात राहिली?

४) आपले इप्सित/ध्येय कशा पद्धतीने गाठता येते असे कवीला वाटते?

५) 'त्रिरश्मी'लेणी अजून कोणत्या नावाने प्रसिद्ध आहे?

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर २७ भाद्रपद, शके १९४२, १८ सप्टेंबर २०२० या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे - ९ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

खास कुमारांसाठी
छात्र प्रबोधनतर्फे ४ दिवाळी अंक!

छात्र प्रबोधन दिवाळी अंक

सवलत मूल्य – छापील अंक ₹ ५०/–, *इ – अंक ₹ ५०/–

• कुमारांच्या भावविश्वाशी जवळीक साधणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीत माणुसकीचा ओलावा टिकवून ठेवणाऱ्या भावकथा, रूपककथा, विज्ञानकथा. हृद्य आठवणींपर, रसास्वादात्मक **ललित लेख!** निसर्गपर, भावपर, आशयसमृद्ध **कविता!** • विज्ञान–तंत्रज्ञान, सद्य घडामोडींवर आधारित **माहितीपर लेख!** • व्यक्तिमत्त्व फुलवण्यासाठी उपयुक्त, **प्रेरणादायी लेख!**

• **कोरोनासह... सकारात्मक जीवनशैलीचा अंगीकार** यावर छोटेखानी विभाग!

• **याशिवाय –** कलाकृती, विज्ञान प्रयोग, शब्दखेळ, कोडी, विनोद, भाषेच्या गमतीजमती इ.

• **मान्यवर लेखक –** संजय ढोले, स्वाती राजे, किरण पुरंदरे, संगीता बर्वे, आश्लेषा महाजन, डॉ. आशुतोष जावडेकर, प्रवीण दवणे, रामचंद्र देखणे, गुंजन कुलकर्णी इ.

सुबोध दिवाळी अंक (ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी)

सवलत मूल्य – छापील अंक ₹ ३०/–, *इ–अंक ₹ ३०/–

• रोचक भावकथा, रहस्यमय विज्ञानकथा, ऐतिहासिक **कथा** • आठवणींपर, अनुभवपर, भटकंतीविषयक **ललित लेख!** • आशयघन **कविता!** • दैनंदिन विज्ञान–तंत्रज्ञान तसेच रसास्वादात्मक **माहितीपूर्ण लेख! • व्यक्तिमत्त्व विकसनपर लेख!**

• **याशिवाय –** विनोद, कोडी, कलाकृती, विज्ञान प्रयोग इत्यादी.

• **मान्यवर लेखक –** सुनील सुळे, राहुल कोकीळ, मुकुंदराज कुलकर्णी, राजेंद्र अत्रे, नूतन शेटे, निरुपमा महाजन इ.

English Diwali Issue

Concessional Price - Printed Issue : ₹ 50/- *E-Issue : ₹ 50/-

• **Stories** about friendship, sportsmanship, heroes in daily life and fascinating science fiction. • Amusing and engrossing **anecdotes** about helping animals, family traditions and cooking... • **Personality Development** articles about self-esteem, accepting your self and taking both success and failure in your stride.

• An overview and analysis of the **National Education Policy** of 2020 by an expert... • **Hands on activities,** puzzles, art, craft and many more!

Eminent Authors - Dr. Dipti Sidhaye, Madhura Lunkad, Ashutosh Bhave, Sunil Sule, Payal Meheta, Dr. Gauri Chaudhari, Ninad Patwardhan.

*'ऐपावा' दिवाळी अंक (Online)

• छात्र प्रबोधन, सुबोध व इंग्रजी या **तीनही दिवाळी अंकांतील साहित्य ऐका–पाहा–वाचा** या स्वरूपात... • **२५ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर** या कालावधीत ५० दिवसात प्रत्येकी दोन लिंक्स! एकूण ऐका पाहा वाचाच्या **१०० लिंक्स.** • २५ ऑक्टोबरपासूनच्या लिंक्स ३१ डिसेंबरपर्यंत केव्हाही, कितीही वेळा ऐकता, वाचता, पाहता येतील... • मोबाईल फ्रेंडली pdf व मान्यवरांच्या आवाजातल्या Audio क्लिप्स. • याशिवाय बरंच काही... **सवलत मूल्य ₹ १००/–**

('*' इ–अंक/ऑनलाइन अंक डाऊनलोड अथवा फॉरवर्ड करता येणार नाहीत.)

तीनही दिवाळी अंकांत..

* अंकातील निवडक लेखांना QR code द्वारा pdf व दृक्/श्राव्य क्लिप्स्‌ची जोड!
* आकर्षक, कल्पक भेट

१५ ऑक्टोबर पर्यंत सवलतीच्या दरात प्रकाशनपूर्व नोंदणी करा.

नोंदणीसाठी...
jpprakashane.org या साइटवरून पैसे भरून दिवाळी अंकांची नोंदणी करा. छापील अंक घरपोच मिळण्यासाठी वेगळी रक्कम भरावी लागेल... (तपशील साइटवर!)

सर्व सभासदांसाठी विशेष सूचना

* आपल्या वर्गणीतला छापील दिवाळी अंक घरपोच मिळण्यासाठी सभासदांनी ₹ ५०/– १५ ऑक्टो.पूर्वी छात्र प्रबोधनकडे पाठवावेत.
* यावर्षी केंद्रांवरती दिवाळी अंकांचे वितरण होणार नाही.
* सभासदांना छापील अंकाऐवजी इ–दिवाळी अंक हवा असल्यास त्यांनी आपले नाव, इ–मेल व मोबाईल क्रमांक खालील मोबाईल क्रमांकावर पाठवावा 9850500438

अधिक माहितीसाठी – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे–३०. ☎ (०२०) २४२०७ १७४/१७५
ई–मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org **संकेतस्थळ :** chhatraprabodhan.org

सौर भाद्रपद, शके १९४२/सप्टेंबर २०२० पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर २७ भाद्रपद, शके १९४२/१८ सप्टेंबर २०२०
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2018-2020
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 18-9-2020

हे छायाचित्र 'दिवेआगर' येथील आहे. सायंकाळच्यावेळी नारळाच्या झाडामागे लपलेला मावळतीचा सूर्य या छायाचित्रात Canon 600D lens 55-250mm या कॅमेऱ्याने टिपला आहे.

– चि. अर्णव देशपांडे, पुणे

सौर दिनदर्शिका शके १९४२		
	सप्टेंबर २०२०	भादपद आश्विन
मं.	1	भा.१०
बु.	2	११
गु.	3	१२
शु.	4	१३
श.	5	१४
र.	6	१५
सो.	7	१६
मं.	8	१७
बु.	9	१८
गु.	10	१९
शु.	11	२०
श.	12	२१
र.	13	२२
सो.	14	२३
मं.	15	२४
बु.	16	२५
गु.	17	२६
शु.	18	२७
श.	19	२८
र.	20	२९
सो.	21	३०
मं	22	३१
बु.	23	आ.१
गु.	24	२
शु.	25	३
श.	26	४
र.	27	५
सो.	28	६
मं.	29	७
बु.	30	८

सभासदांनी आपले व्हॉटस् ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९८५००३५३९८ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी संपर्क साधता येईल.

सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
या अंकाची किंमत : ₹ २०
वार्षिक वर्गणी : ₹ २००

प्रिय पोस्टमन,

कोरोनाच्या संकटकाळातही जोखीम पत्करून हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे.

तुम्ही सुरक्षित राहावे ही प्रार्थना व सर्वतोपरी काळजी घ्यावी, ही आपुलकीच्या नात्याने विनंती!

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन